**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**गुरुवार दिनांक ०६ मार्च २०२५**

**ठळक बातम्या**

1. **राज्याची, राज्य शासनाची भाषा मराठीच - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे विधानसभेत प्रतिपादन.**
2. **'नारी शक्ती सह विकसित भारत' या संकल्पनेवर आधारित यंदाचा महिला दिन साजरा करण्यात येणार.**
3. **धान आणि कापूस उत्पादक शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यासाठी सरकार सकारात्मक - कृषी राज्यमंत्री आशीष जयस्वाल.**
4. **नागपूर मनपाच्या महिला उद्योजिका मेळाव्याचं उद्घाटन, ११ मार्च पर्यंत विविध उत्पादन आणि सांस्कृतिक कार्यक्रमाची मिळणार मेजवानी.**

**आता सविस्तर बातम्या** .......

**मराठी भाषा**

राज्याची, राज्य शासनाची भाषा मराठी असून, राज्यात राहणाऱ्या प्रत्येकाला मराठी भाषा आलीच पाहिजे असं, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधानसभेत स्पष्ट केलं. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरकार्यवाह, भय्याजी जोशी यांनी काल मुंबईत एका कार्यक्रमात मराठी भाषेबद्दल केलेल्या वक्तव्यावर विरोधी पक्षांनी विचारलेल्या प्रश्नाला मुख्यमंत्री उत्तर देत होते.

***(होल्ड बाईट -मुख्यमंत्री -30 सेकंद)***

***सरकारची भूमिका पक्की आहे मुंबईची, महाराष्ट्राची महाराष्ट्र शासनाची भाषा मराठीच आहे. महाराष्ट्रात राहणाऱ्या प्रत्येकाने मराठी शिकलं पाहिजे. प्रत्येकाला मराठी बोलता आलं पाहिजे आणि खरं म्हणजे या माझ्या वक्तव्याच्या संदर्भात भैयाजींचे काही दुमत असेल असं मला वाटत नाही. तथापि मी पुन्हा एकदा शासनाच्या वतीने सांगतो. मुंबईची भाषा मराठी आहे. महाराष्ट्राची भाषा मराठी आहे इतर भाषाचा इथे सन्मान आहे.***

भय्याजी जोशी यांनी मराठी भाषेचा अपमान केल्याचा आरोप करत विधानपरिषदेत विरोधक आक्रमक झाले आणि त्यांनी सभात्याग केला.

महाराष्ट्रात राहणाऱ्या प्रत्येकाला मराठी भाषा आली पाहिजे ,शिकली पाहिजे आणि शिक्षणही मराठीत घेतलं पाहिजे हीच राज्य सरकारची भूमिका आहे, असं मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितलं. दरम्यान, भाषावार प्रांतावर रचना ही देशाची झाली. पण आता हे मुंबईतल्या मुंबईत भाषावार गल्ली गल्लीत भाषा बदल दिसते आहे. ज्या ज्या वेळा मुंबईवर संकट येत, तेव्हा आम्ही उभे असतो असे सांगून, आपल्या सरकारच्या काळात मराठी भाषा सक्तीचा कायदा झाल्याचे शिवसेना नेते उद्धव ठाकरे म्हणाले

***महाराष्ट्र मध्ये मराठी भाषा सक्तीची करण्याचा कायदा हे महाविकास आघाडीचे सरकार असताना मी मुख्यमंत्री असताना केलेला आहे. या कायद्याच्या विरोधात इकडे मराठी भाषा आली नाही तरी चालेल असं बोलण्याचे धाडस करणाऱ्यावरती ती एकावरती कायदाचा जर बडगा उगारला तर यापुढे असं कोणाची बोलायची हिंमत होणार नाही.***

भय्याजी जोशी यांच्या वक्तव्याचा विपर्यास झाल्याचं ते म्हणाले -

***कल एक मुंबई के उपनगर घाटकोपर में एक कार्यक्रम में मेरे कहे हुए एक वक्तव्य को लेकर गलतफहमी हुई है। ऐसा मुझे लगता है। ये सवाल ही नहीं उठता कि मुंबई की भाषा मराठी नहीं है, महाराष्ट्र की भाषा मराठी है, मुंबई महाराष्ट्र में है और स्वाभाविक रूप से मुंबई की भाषा मराठी है। भारत में ऐसे ये विविध भाषाएं बोली जाती हैं। भारत इसके लिए अपने आप में विशेष है। मुंबई में भी विविध भाषी लोग रहते ही हैं जो स्वाभाविक रूप से अपेक्षा रहती है कि वो भी आकर यहाँ पर मराठी सीखें। मराठी समझे मराठी पढ़े इसका आग्रह रहना ही चाहिए क्योंकि हर एक राज्य की अपनी वो एक पहचान है।***

**विधानपरिषद-राज्यपाल अभिभाषण**

विधान परिषदेत आज राज्यपालांच्या अभिभाषणा बद्दलच्या आभार प्रस्तावावर चर्चा पुढे सुरू झाली. भाजप गटनेते प्रवीण दरेकर यांनी चर्चेची सुरुवात करत महायुती सरकारच्या कार्याचा उल्लेख केला. महाराष्ट्र सरकार सीमावर्ती मराठी भाषिकांच्या पाठीशी ठामपणे उभं आहे तसंच, देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्यानं गुंतवणुकीत पुन्हा पहिलं स्थान मिळवलं असून, सरकारचा रोडमॅप राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये प्रतिबिंबित झाला असल्याचं, दरेकर यांनी नमूद केलं. विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी या चर्चेत सहभाग घेत, सरकार जनतेच्या सेवेसाठी कुठेही कटीबद्ध नाही असा आरोप केला. दावोसमध्ये

झालेले करार म्हणजे राज्याची फसवणूक असल्याचं ते म्हणाले. राज्याचं प्रशासन ढेपाळलेलं असल्याचं सांगून त्यांनी लाडकी बहिण योजनेसह अनेक योजनांवर टीका केली. नैसर्गिक आपत्तीमध्ये नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना अद्यापही पूर्ण मदत दिली नसल्याचं दानवे यांनी सांगितलं. राज्यपालांच्या भाषणावर खेद व्यक्त करत असल्याचं ते म्हणाले. भाजपचे प्रसाद लाड यांनी दानवे यांच्या आरोपांचं खंडन केलं. मुख्यमंत्र्यांच्या १०० दिवसांच्या कार्यक्रमाचा उल्लेख करत, सर्व विभागांचं कामकाज सुरळीत होत असल्याचं सांगितलं.

**पवित्र पोर्टल -विधान परिषद**

राज्यात पवित्र पोर्टलच्या माध्यमातून शिक्षकांची कोणतीही चुकीची भर्ती झालेली नाही असं शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी आज विधानपरिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात स्पष्ट केलं. पवित्र पोर्टलच्या माध्यमातून भर्ती करण्यात आलेल्या शिक्षकांच्या इतर माध्यमांच्या शाळेमध्ये नियुक्ती केल्याबाबतचा तारांकित प्रश्न, राष्ट्रवादी काँग्रेसचे इंद्रिस नायकवडी यांनी उपस्थित केला होता त्याला भुसे यांनी उत्तर दिलं.

**राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू**

'नारी शक्तीसह विकसित भारत' या संकल्पनेवर आधारित, यंदाचा महिला दिन साजरा करण्यात येणार असल्याची घोषणा, केंद्रीय महिला आणि बालकल्याण मंत्री अन्नपूर्णा देवी यांनी आज केली. या निमित्तानं नवी दिल्ली इथं विज्ञान भवनात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या उपस्थितीत एका परिसंवादाचं आयोजनही करण्यात आल्याचं, त्यांनी व्हिडीओ संदेशात म्हटलं आहे. महिलांनी आर्थिक, सामाजिक, राजकीय, राष्ट्रीय तसंच वांशिक, भाषिक आणि सांस्कृतिक सीमा ओलांडून दाखवलेल्या कर्तृत्वाचा गौरव करण्यासाठी यंदा या कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं आहे. सरकार विविध धोरणं आणि योजनांच्या माध्यमातून महिला सबलीकरण आणि लिंगभाव समानतेसाठी काम करत असल्याचंही त्या म्हणाल्या.

**वेव्ज इंडिया २०२५**

माहिती आणि प्रसारण मंत्रालयानं आयोजित केलेल्या, वेव्ज इंडिया-२०२५ या कार्यक्रमांतर्गत मनोरंजन आणि माध्यम क्षेत्रात काम करणाऱ्यांसाठी, वेव्ज बाजार हे व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात आलं आहे. या उपक्रमांतर्गत चित्रपट, टीव्ही, ॲनिमेशन, गेमिंग, जाहिरात, संगीत दिग्दर्शन, रेडिओ यांसह माध्यमांच्या विविध प्रकारांना थेट बाजारपेठ उपलब्ध करून देण्यात येणार आहे. जाहिरात

किंवा चित्रपटांचे निर्माते, गेम डेव्हलपर आदींसाठी या उपक्रमाच्या माध्यमातून आर्थिक सहाय्य मिळू शकणार आहे.

**आशीष जयस्वाल**

महाराष्ट्रात धान आणि कापूस उत्पादक शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यासाठी सरकार सकारात्मक असून, मंत्रिमंडळ बैठकीत याबाबत निर्णय घेतला जाईल असं, कृषी राज्यमंत्री आशीष जयस्वाल यांनी विधानसभेत एका प्रश्नाला उत्तर देताना सांगितलं. आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी याबाबत प्रश्न विचारला होता. नगर पालिका, नगर पंचायत क्षेत्रातल्या शेतकऱ्यांना, डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजनेचा लाभ देण्याची मागणी, आमदार बाबासाहेब देशमुख यांनी केली. यावर तपासून कार्यवाही करण्याचं आश्वासन, कृषी मंत्र्यांनी दिलं.

**"अंतर्राष्ट्रीय महिला दिवस"**

भारत सरकारच्या सांस्कृतिक मंत्रालय अंतर्गत येणाऱ्या नागपूर इथल्या दक्षिण-मध्य क्षेत्र सांस्कृतिक केंद्रातर्फे, ८ मार्च ते १० मार्च २०२५ दरम्यान, "आंतरराष्ट्रीय महिला दिना" निमित्त "स्त्री महोत्सव" आयोजित केला जात आहे. या महोत्सवात विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं असून, कार्यक्रमात महिला कलाकारांचे विविध सादरीकरण होणार आहे. ८ मार्च २०२५ रोजी सायंकाळी ६.३० वाजता महाराष्ट्रातील प्रसिद्ध लोककला "भारुड" सादर केली जाईल.

**मुस्लिम मराठी साहित्य संमेलन**

अखिल भारतीय मुस्लिम मराठी साहित्य परिषद, सोलसपूर द्वारा, '१०वे अखिल भारतीय मुस्लिम मराठी साहित्य संमेलन' नागपूरात १९, २० एप्रिल २०२५ रोजी, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज सभागृह, रमण सायंस केंद्राजवळ आयोजित करण्यात आलं आहे. संमेलनाचे मुख आमंत्रक प्रसिध्द साहित्यिक, विचारवंत प्रा.जावेद पाशा कुरेशी असून, या आयोजनात नागपुरातील भारतीय मुस्लिम परिषद, फुले-शाहू आंबेडकर विचारमंच, श्रीगुरूदेव सेवा मंडळ, डॉ.मेघनाथ साहा विचार मंच, छवी पब्लिकेशन्स या संस्थासह आयोजक आहेत.

**उद्योजिका मेळावा**

नागपूर महानगर पालिकेच्या समाज विकास विभागाद्वारे शहरातील महिला उद्योजिका, बचत गटातील महिलांच्या कौशल्याला वाव मिळवून देण्याच्या हेतूने आयोजित महिला उद्योजिका मेळाव्याचे काल रेशीमबाग इथं विभागीय आयुक्त माधवी खोडे यांच्या हस्ते उद्घाटन झाले. प्रमुख अतिथी म्हणून मनपा आयुक्त

आणि प्रशासक डॉ.अभिजीत चौधरी, अतिरिक्त आयुक्त आंचल गोयल उपस्थित होते. मनपाद्वारे आयोजित महिला उद्योजिका मेळाव्याचे त्यांनी कौतुक केलं. बचत गटांना एकाचवेळी २५० स्टॉल्स उपलब्ध करून देणे ही मोठी उपलब्धी असल्याचे सांगत त्यांनी आयोजनाबाबत समाज विकास विभागाचे अभिनंदन केले. महिला उद्योजिका मेळाव्यात आज प्रसन्न जोशी आणि त्यांच्या चमूद्वारे गझल संध्या कार्यक्रमाचे सादरीकरण केले जाईल. तर उद्या सचिन डोंगरे ग्रुप आणि अवंती काटे ग्रुप यांचे नृत्य रंग कार्यक्रम सादर केला जाणार आहे.

**अन्न प्रक्रिया उद्योग**

आत्मनिर्भर भारत मोहिमेंतर्गत पंतप्रधान सुक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजना महाराष्ट्रासाठी वरदान ठरत आहे. भंडारा जिल्ह्यात योजना यशस्वीपणे राबविण्यात आली असून यासाठी लाभार्थी तसंच विविध बँकासोबत अर्थ सहाय्यासाठी, तालुकास्तरावर कृषी जागृती पंधरवाडा मोहिमेचं आयोजन करण्यात आलं आहे.

**तिकीट निरीक्षक**

मध्य रेल्वेच्या नागपूर विभागाच्या मुख्य तिकीट निरीक्षक, आलोक झा यांनी तिकीट तपासणी उत्पन्न निर्मितीत असाधारण कामगिरी केली आहे. त्यांनी एप्रिल २०२४ ते फेब्रुवारी २०२५ या कालावधीत, ५ हजार ५९९ प्रवाशांकडून ३७ लाख आठ हजार १३७ रुपये इतके विक्रमी उत्पन्न मिळवलं आहे.

******